ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

# 32.

# ‘शिकला गजा झाला राजा’ या बालकादंबरीतील वाङ्मयीन विशेष

**प्रा.डॉ.सुशीलप्रकाश चिमोरे**
मराठी विभागप्रमुख, श्री हावगीस्वामी महा,उदगीर.
मो.९९२२९६६५२६

मराठी साहित्याच्या प्रांतात बालसाहित्य प्रकाराला फार मोठी परंपरा आहे. विशेषत: बालकांसाठी बालसाहित्य लिहिणे अतिशय कठीण काम असते. हे कठीण बालकादंबऱ्या लिहून काही बालकादंबरीकारांनी केले आहे. ‘धर्माची गोष्ट’ बाबा भांड, ‘गोट्या’ ना.धो. ताम्हणकर, ‘श्यामची आई’ साने गुरुजी, ‘मांग्या’ हा.दो. पाटील यांनी बालकादंबरीच्या क्षेत्रात महत्त्वाची भर घातली आहे. रानातल्या मुलांना शिक्षण शिकविण्यासाठी दत्ता डांगे यांनी ‘शिकला गजा झाला राजा’ ही बालकादंबरी लिहिली आहे. या बालकादंबरीचे वाङ्मयीन सौंदर्य पुढीलप्रमाणे पाहता येईल.

‘शिकला गजा झाला राजा’ या बालकादंबरीचा नायक गजा आहे. गजाचे रूपसौंदर्य कादंबरीकाराने अतिशय जिवंतपणे घडविले आहे. गजा गोंडस, गोरागोमटा, गोबऱ्या गालाचा, भुरे कान, सोनेरी केस, टपोरे डोळ्याचा, डोळ्यात एक आगळेच तेज असलेला, चारचौघांमध्ये उठून दिसणारा जसा राजबिंडा तसाच सत्त्वशील, देवगुणी, देखणा आहे. कादंबरीकाराने गजाच्या रूपसौंदर्याबरोबरच त्याच्या गुणसौंदर्याचे वर्णन अतिशय ताकदीने कादंबरीत उभे केले आहे.

‘शिकला गजा झाला राजा’ या बालकादंबरीचे कथानक गजाच्याच भोवती फिरते. धनु सेठ या मातब्बर राजाच्या घरी गजाचे आई-वडील व्याजातच काम करतात आणि व्याजातच मरून जातात. त्यामुळे गजा पोरका होतो. धनू सेठच्या घरी गुरे राखण्याचे काम गजा करतो. आई-वडिलांच्या अंगावरील वाढलेले कर्ज त्यांच्या मृत्यूनंतर कमी करतो. योगायोगाने शेतात मोहोळ मारताना त्याला एका अनोळखी मुलीचा आवाज कानावर पडतो. तिच्या पायात घुसलेला काटा, तो अतिशय आस्थेवाईकपणे काढतो. गजा आणि सलमा यांची ओळख होते. दोघांची मने जुळतात आणि दोघांत प्रीत जडते. या कादंबरीची नायिका सलमा शिक्षण शिकत असल्यामुळे आपल्या प्रियकरालाही ती लिहायला-वाचायला शिकविते. अशातच दहावी वर्गाचा निकाल लागतो. त्याची प्रेयसी सलमा जिल्ह्यात पहिली येते. ती शहरात शिकायला जाते. इकडे गजा मात्र मिळालेल्या वेळेत लिहायला-वाचायला शिकतो व आपल्या गुरेराखी सवंगड्यांनाही लिहायला-वाचायला शिकवितो. आपले मालक चतकोर भाकर देऊन आपणाला कसे गुलाम बनवितात, हे आपल्या गुलाम मित्राला सांगतो. अशातच सलमाचे शाळेतील मित्र-मैत्रिणी गजाला भेटायला जंगलात येतात. गजाने जंगलातील पोरांना लिहायला-वाचायला कसे शिकविले आहे, या जगाची माहिती तो आपल्या सवंगड्यांना कशी देतो याची सर्व माहिती सलमाचे मित्र वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करतात. त्याची मुलाखत घेतली जाते. धनू सेठ आपणाला कसा छळतो, कसे गुलाम बनविले हेही सांगतो. तेव्हा धनू सेठला त्याचा राग येतो व तो त्याला चाबकाने मारतो आणि त्याला फाशीची शिक्षा देण्याचे ठरवितो. गजा यावेळी एकच इच्छा व्यक्त करतो की मला फाशीची शिक्षा जरूर द्या; पण मला जनतेशी काहीतरी हितगुज करू द्या. तेव्हा गावातील असंख्य लोक गजाला भेटायला येतात. ही त्याची लोकप्रियता पाहून राजा त्याला दिलेली शिक्षा रद्द करतो. गजाच्या ठिकाणी असलेली चतुराई, त्याची बुद्धिमत्ता, त्याची कल्पकता पाहून राजा, गजालाच राजा बनवितो आणि गजा जेव्हा राजा होतो तेव्हा त्याचे लग्न त्याची प्रेयसी सलमाशी होते. हा कथाभाग या कादंबरीत अतिशय सहज आणि कल्पकतेने दत्ता डांगे यांनी या कादंबरीत चित्रित केला आहे.

प्रस्तुत बालकादंबरीत अनेक पात्रे आहेत. ही पात्रे लेखकानी तितक्याच जिवंतपणे साकार केली आहेत. एखादी छोटी घटना जेव्हा कमीत कमी पात्राच्या माध्यमातून बालकादंबरी सांगितलेले असते तेव्हा तिचा आवाका इतर कादंबरीपेक्षा लहान असतो. कारण एकच एक संस्कार बालकादंबरीतून लेखकाला रूजवायचा असतो. कादंबरीचा नायक गजा, नायिका सलमा, मालक धनूसेठ, सलमाची आई, तिचे मित्र-मैत्रिणी, पत्रकार, जॉन, भीमू, बेबी, नंदा अशा अनेक कादंबरीतील पात्रांच्या माध्यमातून कादंबरीचे हे भावविश्व लेखकाने अतिशय सामर्थ्यशाली पद्धतीने उभे साकारले आहे.

संवाद हा कादंबरीचा आत्मा असतो. कादंबरीला गतिमानता आणि प्रवाहीत्व संवादामुळेच प्राप्त होते. कादंबरीतील संवाद हे बोलके, रोचक, सजीव असतात. ते दैनंदिन जीवनातील असतात. अशा संवादांमुळेच या कादंबरीला यश प्राप्त झाले आहे. या कादंबरीतील संवाद अतिशय बोलके, सहजसोपे, जिवंत, प्रसंग, पात्रानुसार बदलताना पहावयास मिळतात. गजा आणि सलमा यांच्यातील संवाद पुढीलप्रमाणे आहेत.

'मुन्नी तुझं नाव काय?'
'सलमा'
'कुठं राहतेस?'
'फुलवा गावात !'
'कोणत्या ठिकाणी?'
'मश्जिदीजवळ'
'बरं !'
'तुला एक गोष्ट माहीत आहे का?'
'जलंदर गावच्या बिलंदर राजाची?'
'या राजाची गोष्ट माहीत नाही.'

अशा प्रकारचे जिवंत संवाद अतिशय साध्या-सोप्या भाषेत, हलक्या फुलक्या पद्धतीने कादंबरीकाराने कादंबरीत जिवंतपणे उभे केले आहेत.

**चमत्कृतीप्रधानता :**

जिज्ञासापूर्ती, उत्कटता, कल्पकता हे बालमनाचे गुणधर्म आहेत. हेच गुणधर्म या बालकादंबरीत पहावयास मिळतात. ही कादंबरी वाचत असताना एक प्रकारची उत्कटता आणि जिज्ञासा अधिक वाढीस लागते. एखादा चित्रपट किंवा नाटक पहात असताना पुढे काय घडणार आहे हे पाहण्याची रसिकाची जशी उत्कंठा लागलेली असते तशाच प्रकारे या कादंबरीतील अनाथ नायक गजा धनूशेठजवळ कसा राहतो, गुलामीत कसे दिवस काढतो, अशातच सलमावर त्याचे प्रेम कसे होते, सलमाकडून तो लिहायला-वाचायला कसा शिकतो व आपल्या संवगड्याला लिहायला-वाचायला कसे शिकवतो, त्याची लोकप्रियता कशी वाढते, त्याला राजा फाशी देण्याचे कसे जाहिर करतो या सर्व घटना आणि प्रसंगामुळे या कादंबरीत नाट्यात्मकता साधली आहे. नाट्यात्मकता हे या कादंबरीचे विशेष आहे.

कादंबरीकाराने कादंबरीला गतिमानता प्राप्त होईल, कादंबरीला सौंदर्य प्राप्त होईल अशा प्रकारची वर्णने या कादंबरीत केलेली आहेत. या कादंबरीतील वर्णनकौशल्य कादंबरीच्या सौंदर्यात भर पाडणारी आहेत. औचित्याचा भंग होणार नाही याची काळजी कादंबरीकाराने कादंबरीत घेतली आहे. पूर्व दिशा उजळली होती, तांबूस सोनेरी सूर्य हळूहळू डोंगराच्या आडून वर येत होता. पक्षांचा किलकिलाट चाललेला, गजाच्या शेजारी असलेल्या पिंजऱ्यातून पोपट मिठू-मिठू करीत होता आणि गजाला जणू म्हणत होता,

'गजा, गजा ऊठ राजा
मालक येईल देईल सजा'

अशा प्रकारचे जीवंत वातावरण कादंबरीत घडवित असताना बालमनाला आवडेल असे वर्णन-सौंदर्य कादंबरीत कादंबरीकाराने रेखांकित केले आहे.

बालमनाच्या आवडी-निवडी समजल्याशिवाय बालसाहित्य लिहिताच येत नाही. बालकांना बालगीताची आवड असते. म्हणूनच कादंबरीत पदोपदी कादंबरीकाराने काव्यात्मक बालगीतांची रचना केली आहे. या काव्यात्मक बालगीतामुळे कादंबरीतील आशयात सौंदर्याची भर पडली आहे.

'राजा राजा
नुसता बाजा
लोकांना पिळून
मारतो मजा'

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

अशा प्रकारची काव्यात्मकता या कादंबरीत आल्यामुळे या बालकादंबरीला सौंदर्याची चकाकी, लकाकी प्राप्त झाली आहे.

'शिकला गजा झाला राजा' या बालकादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे अद्‌भूतरम्यता हे होय. बालकादंबरीचे वैशिष्ट्य असे की, बालमनाचे रंजन करणे आणि तेही अद्‌भूत गोष्टीतून करणे. या कादंबरीत गजा जंगलात राहूनच शिक्षण घेतो आणि राजा होतो. ही वास्तव जीवनात अशक्य बाब असते. परंतु अशा या अद्‌भूत गोष्टीबद्दल बालमनाला कमालीचे आकर्षण असते. म्हणून बालकादंबरीची रचना अद्‌भूतरम्य असते. अद्‌भूतरम्य कादंबरीची परंपरा मुक्तामाला, मोचनगड, मंजुघोषा यापासून सुरु होते. अद्‌भूतता आणि रंजकता हे वैशिष्ट्य त्या कादंबरीचे होते. साहस, संकट, सुटका हे तंत्र अद्‌भूतरम्य कादंबरीचे असते. तेच बालकादंबरीचेही आहे. ह्याच तंत्रात 'शिकला गजा झाला राजा' ही कादंबरी दत्ता डांगे यांनी लिहिली आहे. म्हणून या कादंबरीचे वैशिष्ट्य असे की ही कादंबरी अद्‌भूतात रमणारी आहे.

विनोदनिर्मिती हे या कादंबरीचे गुणविशेष आहे. विनोदाची आवड ही बालमनाला असते. याची जाणीव कादंबरीकाराला आहे. विनोदाची सहज पद्धतीने बीजपेरणी या कादंबरीत कादंबरीकाराने केली आहे. गजा जंगलात गुरे राखीत बसलेला आहे आणि त्याचे डोळे सलमा येऊन झाकते तेव्हा गजा सलमाच्या हातातील बांगड्यावरुन हात फिरवित न ओळखण्याचं नाटक करीत म्हणतो, 'धनुसेठ' तर सलमा त्याला म्हणते, 'तुझ्या धनुशेठच्या हातात बांगड्या आहेत होय?' अशा प्रकारची विनादनिर्मिती या कादंबरीत पहावयास मिळते.

'शिकला गजा झाला राजा' ही बालकादंबरी गजाच्या सभोवती फिरते. गजाच्यामाध्यमातून सामाजिक जीवन साकार करण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. या देशातील भांडवलदार लोक येथील रोजगार आणि कामगार लोकांना व्याजाने पैसे देऊन चतकोर भाकरीसाठी कसे गुलाम बनवितात, राजा प्रजेवर कशा प्रकारचा अन्याय करतो याचे वास्तववादी चित्रण या कादंबरीत आलेले आहे. समाजातील सरंजामदारी वृत्तीवर लेखकाने सुचकपणे कादंबरीत प्रकाश टाकला आहे. या कादंबरीला सामाजिक जीवनाचा स्पर्श झालेला आहे. गजाच्या जीवनातील सुख-दु:खाला अतिशय प्रभावशालीपणे कादंबरीत मांडले आहे. व्यक्तिप्रधानता हे या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे.

एक आई-वडील नसलेला अनाथ पोरका मुलगा धनुशेठच्या घरी गुलाम म्हणून असतो. योगायोगाने त्याला सलमा नावाची मुलगी भेटते. तिच्या पायातील घुसलेला काटा हा काढतो. या उपकाराची जाणीव म्हणून ती त्याला लिहायला-वाचायला शिकविते. गजा ही आपल्या सवंगड्यांनाही लिहायला-वाचायला शिकवतो. हे सलमाचे मित्र-मैत्रिणी पाहतात आणि त्यांची वर्तमानपत्रातून बातमी देतात. त्याची लोकप्रियता वाढते. त्याची मुलाखत घेतली जाते. मुलाखतीत राजा कसा प्रजेवर अन्याय करतो हे सांगतो. तेव्हा त्याला राजा फाशी देण्याचे कबुल करतो. फाशी देत असताना त्याचे हितचिंतक त्याला भेटायला येतात. त्याची ही लोकप्रियता पाहून राजा त्याला फाशी देण्याचा निर्णयात बदल करतो व त्याला राजा करतो. हे सगळे अद्‌भूत, कल्पनारम्य वाटते. अशा या स्वप्नाळू वृत्तीचे वेड बालमनाला असते. म्हणून कल्पनाप्रियता हे या कादंबरीचे गुणविशेष सांगता येईल.

निरपेक्ष प्रेमभाव हे या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे. फुलवा गावातील आणि या कादंबरीतील नायक गजा यांचे रक्ताचे नाते नसतेच. तरीही गजाचा गोंडसपणा, राजबिंडपणा, चुणचुणीतपणा, देखणेपणा पाहून फुलवा गावचे लोक गजावर निरपेक्ष भावनेने प्रेम करतात. एवढेच नाही तर राजाने त्याला फाशी दिल्यावर गावातील सर्व लोक त्याला भेटायला येतात. आणि त्याच्या ह्या लोकप्रियतेमुळे आणि लोकांच्या निरपेक्ष प्रेमामुळे राजा त्याला फाशीची शिक्षा न देताच सोडून देतो. फुलवा गावातील सर्व जनता जशी निरपेक्ष प्रेम करते तसाच गजाही त्या गावातील लोकांवर निरपेक्ष प्रेम करतो. कुणाला आई, कुणाला ताई, कुणाला मावशी म्हणून हाक मारतो, वडील माणसांची कामे करतो, म्हाताऱ्या माणसाची सेवासुश्रुषा करतो, सलमाच्या आईचीही तो सेवासुश्रुषा करतो अशा प्रकारे निरपेक्ष प्रेमभाव हे या बालकादंबरीचे वैशिष्ट्य आहे ते या कादंबरीत आलेले आहे.

अनुकरणप्रियता हे या बालकादंबरीचे गुणवैशिष्ट्य आहे. लहान बालके आपल्यापेक्षा मोठ्या असलेल्या माणसाचे नव्हे तर आपल्या सवंगड्याचेही अनुकरण करतात. गजाला सलमा लिहायला-वाचायला शिकविते. तिचे अनुकरण करुनच गजा लिहायला वाचायला शिकवितो. तर गजाचे अनुकरण करुन त्यांचे सर्व सवंगडी मित्र त्याच्यासारखेच लिहायला वाचायला शिकतात. बालमनाचे गुणधर्म हे अनुकरणप्रियता असते. तेच गुणधर्माचे चित्रण बालकादंबरीत लेखकाने केले आहे. म्हणून अनुकरणप्रियता हे या बालकादंबरीचे वैशिष्ट्य आहे.

संघर्ष हा मानवी जीवनाचा आत्मा आहे. संघर्षाशिवाय मानवी जीवन असू शकत नाही. तसेच संघर्षप्रियता हे बालमनाचा गुणधर्म आहे. हा गुणधर्म गजाच्या ठिकाणी पहावयास मिळतो. गजाचे आई-वडील वारलेले आहेत तरीही जीवनाशी संघर्ष करीत धनुशेठच्या घरी तो काम करतो. राजा चतकोर भाकरीसाठी कसे कामगाराला गुलाम करतो याची जाणीव तो आपल्या गुरेराखी

सवंगड्यांना करून देतो. राजाच्या विरुद्ध कटकारस्थान केल्यामुळे राजा त्याला फाशीची शिक्षा देण्याचे ठरवितो. तरीही तो फाशीची शिक्षा उपभोगण्यासाठी मागे सरत नाही. उलट फाशी देण्याअगोदर मला काहीतरी जनतेला बोलण्याची इच्छा आहे ती इच्छा राजाने पूर्ण करावी असे गजा म्हणतो. गजाच्या जीवनात जगण्यासाठीचा आलेला संघर्ष अतिशय सहजसोप्या पद्धतीने कादंबरीकाराने गडद स्वरूपात चित्रित केलेला आहे. 'शिकला गजा झाला राजा' या कादंबरीची भाषाशैली साधीसोपी आहे. बालमनाचे मनोरंजन करणारी ही कादंबरी असल्यामुळे बालकांना समजेल, उमजेल, कळेल, रुचेल आणि पचेल, आवडेल अशी भाषाशैली या कादंबरीत आलेले आहे. छोटे छोटे पैंजणासारखी वाक्यरचना हे या कादंबरीचे विशेष आहे.

या कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळ्या रसाचे परिपोष या कादंबरीत साधलेले आहे. या कादंबरीचा नायक सुंदर आहे, गोरागोमटा, गोलगोबरे गाल, भुरे सोनेरी केस, टपोरे डोळे, राजबिंडा, कुणीही पाहिला तर सहज त्याच्या नजरेत भरणारा आहे. तर सलमा ही सुंदर आहे. ती गुलाबी झगा घातल्यामुळे तिच्या सौंदर्यात आणखी भर पडली आहे. व्यक्तिचे वर्णनकौशल्य आणि त्यामुळे निर्माण झालेला शृंगाररस आस्वादाकांच्या हृदयाचा ठाव घेतो. या कादंबरीत वीररस आलेला आहे. वयाने छोटा असला तरी गजाच्या अंगी प्रचंड आत्मविश्वास आहे. जंगलात स्वत: जनावरे राखून मोहाळ मारून सलमाच्या मित्र-मैत्रिणीला देतो. सर्व बालके अस्वलावर बसतात. राजा कसा प्रजेला छळतो, अन्याय कसा करतो हे अतिशय परखडपणे गजा लोकांना सांगतो. राजाने फाशी जाहिर केल्यावर तो तयार होतो पण धाडसाने फाशी देण्याअगोदर मला काहीतरी लोकांना सांगायचं आहे हेही म्हणणे व्यक्त करतो. यावरुन त्याचे धाडस निर्भीडपणा व परखडपणा लक्षात येतो. त्याची ही वीरवृत्तीचे दर्शन या कादंबरीत घडते. गजाचे आईवडील लहानपणीच वारले. तो अनाथ, पोरका आहे. आई-वडिलांनी काढलेल्या कर्जात तो गुलामी स्वीकारतो. चतकोर भाकरीसाठी गुलाम होतो. काम करत नसला की गजाच्या पाठीवर गणूसेठच्या चाबकाचे फटके बसतात ही त्याची अवस्था पाहून त्याच्याबद्दल दया यायला लागते. म्हणजेच या कादंबरीत करुण रसाची निर्मिती झाली आहे. समाजातील भांडवलदार कामगारांचे कसे शोषण करतात, आहे रे आणि नाही रे च्या वर्गातील चाललेला संघर्ष या कादंबरीत अतिशय सूचकपणे लेखकाने रेखाटलला आहे. गजा जेव्हा जनतेवर राजा कशा प्रकारचा अन्याय करतो हे वर्तमानपत्रातून सांगतो आणि त्याची मुलाखत प्रकाशित होते. राजाचा उल्लेख करताना तो म्हणतो,

'राजा राजा
नुसता बाजा
लोकांना पिळून
मारतो मजा'

राजाच्या शोषणाचे वास्तवदर्शन गजा समाजाला सांगतो. तेव्हा राजाला त्याचा राग येतो आणि त्याला शिक्षा देतो. हे त्याचे वागणे म्हणजे रौद्र स्वरूपाचे आहे. जेव्हा धनूसेठला म्हणतो, मी तुमचा गुलाम नाही. तुम्ही माझे मालक नाही. उलट माझ्या कष्टाची कमाई तुमच्याकडे आहे. तेव्हा तुमची कामे तुम्ही करा. मी स्वतंत्र आहे. तेव्हा गजाच्या या बोलण्याने धनूसेठ चवताळून म्हणतो, गाढवा, इथून चालता हो. यावेळचे धनुशेठने धारण केलेले रौद्र रुपाचे दर्शन लेखकांनी जीवंतपणे घडविले आहे. याठिकाणी रौद्र रसाची निर्मिती झाली आहे. वेगवेगळ्या रसांच्या मिश्रणामुळे ही कादंबरी लक्षणीय स्वरूपाची ठरली आहे. स्वत:बद्दलचा आत्मविश्वास आणि स्वत:ला आलेले आत्मभान त्यातून गजाच्या ठिकाणी निर्माण झालेली बंडखोर वृत्ती चित्रित होते. या कादंबरीमध्ये रसाच्या परिपोषाबरोबरच प्रतिक प्रतिमांनी नटलेली ही कादंबरी आहे. कादंबरीची नायिका सलमा गुलाबी झगा अंगावर परिधान केलेली आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१) बालसाहित्य - रविंद्रनाथ ठाकूर, साहित्य अकादमी, न्यू दिल्ली, द्वितीय आवृत्ती २००८
२) साहित्यास्वाद-डॉ.सुशीलप्रकाश चिमोरे, मुक्तरंग प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती २००८
३) प्रबोधन आणि आस्वाद-संपा.प्रा.बाळासाहेब दास, प्रा.संजय साठे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २६ जानेवारी २०१२
४) मध्ययुगीन व आधुनिक कविता-संपा.डॉ.मा.मा. जाधव, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१२

❑❑❑